**विशेष दिवाणी दावा क्रमांक – २३/२०२०**

**नि.क्र. ३४/क सोबत**

**उलटतपास शपथेवर सुरु**
**उलटतपास प्रतिवादींतर्फे विद्वान वकील श्री. व्ही. पी. चुडमुंगे यांचे तर्फे सुरु :-**

१०. प्रतिवादी विमल माळी ही माझी बहिण आहे. मी धरणगुत्ती येथे राहते व प्रतिवादी माणकापुर येथे राहते. आम्ही लग्नापासुन आपआपल्या गावी राहतो. आमच्या दोघीत काही वाद नव्हता. माझ्याकडे कधी कधी बहिण या नात्याने ती येत होती. माझे व तिचे संबंध चांगले होते. आम्ही दोघीही अशिक्षित आहोत. माझे वडिलांची साडेपाच एकर शेती हुपरी येथे होती. सदर शेती वडीलच करत होते. माझे वडिलांचे नांव आण्णासाहेब गणू माळी असे होते. हे म्हणणे खरे आहे की, वाटपासाठी मी दावा दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्याकरिता तिचे मला सहकार्य होते. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही त्या दाव्याबाबत सल्लामसलत करत होतो. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही दोघी एकमेकीला आवश्यक तिथे सह्या देत होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी तिच्या कडून सह्या घेतलेल्या नाहीत व तिने माझ्याकडून सह्या घेतलेल्या नाहीत.

११. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीचा दावा करतेवेळी वाटप झाले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, दावा करतेवेळी कोणाला कोणती मिळकत द्यायची हे ठरले नव्हते. प्रतिवादीने मला नोटीस दिली होती. परंतु, ती कशासाठी होती हे मला सांगता येणार नाही. हे मला आठवत नाही की, मला नोटीस आली त्यावेळी मी जमीन वाटुन घेतली होती किंवा नव्हती. ती नोटीस कशासाठी आली होती हे मला आठवत नाही.

**प्रतिवादीचे विधिज्ञांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

वा.दा.का.दा. श्रवणोत्तर स्वीकृत्त,

दिनांक – २३.१२.२०२५

(जी. एम. नदाफ)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
इचलकरंजी.

**उलटतपास शपथेवर पुन्हा सुरु**

१२. माझे काहीही शिक्षण झालेले नाही. माझे वडिलांचे गांव हुपरी आहे. माझ्या मोठया भावाचे नांव आप्पासाहेब व त्याच्या बायकोचे नांव सरुबाई असे होते. ते दोघे मयत आहेत. माझ्या दुस-या भावाचे नांव बाळासाहेब आहे. आप्पासाहेब यांना चार मुली व एक मुलगा आहे. बाळासाहेब यांना दोन मुली व एक मुलगा आहे. मला दोन बहिणी आहेत. दावा मिळकत वडिलार्जित आहे. हे म्हणणे खरे आहे की, रे.दि.दा.क्र. ७३/२००८ चा दावा वाटपासाठी दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या दाव्यामध्ये माझा, विमल, महादेवी, आप्पासाहेब व बाळासाहेब यांचा प्रत्येकी १/५ हिस्सा ठरला होता. हे म्हणणे खरे नाही की, आमचे भावा-बहिणींचे संबंध चांगले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही कोर्टाचे निकालाप्रमाणे आमचे हिस्से तुटक करुन घेतले नाही. माझ्या बहिणींनी कोर्टाचे निकालाप्रमाणे त्यांचे हिस्से तुटक करुन घेतले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ५.७.२०१४ पासुन दावा मिळकत आहे तशीच आहे. महादेवी व विमल ह्या माझ्या बहिणींनी त्यांचा हिस्सा तुटक करुन मिळणेसाठी अर्ज दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा अर्ज कोर्टात केला नव्हता. मी माझा हिस्सा तुटक करुन मिळणेसाठी इतर हिस्सेदारांना नोटीस दिली होती किंवा कसे हे मला आता आठवत नाही.

१३. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीच्या चतुःसिमा मी चुकीच्या नमुद केल्या आहेत. सन २०१६ साली आमचेत वाटण्या झाल्या होत्या. मी सदर वाटणी झालेबाबत कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे का ते मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीचे वाटप झालेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, वाटपासाठी प्रकरण जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे पाठविणेत आले होते. वाटपाचा निकाल झाला आहे तो या कामी दाखल करणेस मी तयार आहे.

**उलटतपास प्रतिवादीचे विधिज्ञांच्या तोंडी विनंतीवरुन पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

वा.दा.का.दा. श्रवणोत्तर स्वीकृत्त,

दिनांक – १४.०७.२०२६ दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, इचलकरंजी.

**उलटतपास शपथेवर पुन्हा सुरु**

१४. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. ७५० बाबत वाटपाचा दावा मी दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.७५० मधील ५० आर क्षेत्राचे खरेदीपत्र उलटून रावसाहेब बळवंत निकम यांचेकडून माझे वडिल व चुलते यांनी घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदरची जमीन वडिलार्जित होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर वाटपाच्या दाव्यात माझे वडील आण्णासाहेब गणु माळी यांचे पश्चात मला, विमल, बाळासाहेब, महादेवी व आप्पासाहेब यांना प्रत्येकी १/५ हिस्सा मिळाला. हे म्हणणे खरे आहे की, मी माझा हिस्सा स्वतंत्र करुन कोर्टा मार्फत घेतला आहे. हे म्हणणे खरे आहे की, बाकीचे लोकांचा असणारा प्रत्येकी १/५ हिस्सा समाईकात राहिला. हे म्हणणे खरे नाही की, आमचेत वाद असलेमुळे मी माझा हिस्सा तुटक करुन घेतला. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २५.६.२०१९ रोजी वाटपासाठी समजुतीचा करारनामा झाला होता. विमल हीचे साधे घर आहे किंवा कसे हे मला माहित नाही. मी तिच्या घरी गेले होते. ती भाडयाच्या घरात राहते. हे मला माहित नाही की, तिच्या घरी लाईट आहे किंवा नाही. हे म्हणणे खरे नाही की, तिचे घर रहाणे योग्य नाही. मी २-३ वर्षापूर्वी तिच्या घरी गेले होते. मी विमल हिच्या घरी ती बहिण असलेमुळे गेले होते. तिला दिपक व अमोल अशी दोन मुले आहेत. विमल हिचे पती हयात आहेत. हे म्हणणे खरे आहे की, विमल हिची गरिबीची परिस्थिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, विमल ही दुस-याच्या शेतात काम करते. हे म्हणणे खरे आहे की, मी २-३ वर्षापूर्वी तिच्या घरी गेले होते त्यानंतर कधीही गेलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, २-३ वर्षापूर्वी मी तिच्या घरी कधीही गेलेले नाही. तिच्या घरी मी कोणत्या वर्षी गेले होते त्याची तारीख व वार याबाबत मी सांगु शकत नाही.

१५. गट नं.७५० मध्ये घर आहे. त्या दाव्यात घराचे वाटप मागितलेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मला ३५ गुंठे क्षेत्र बाळासाहेब व आप्पासाहेब यांचेकडून मिळाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, ३५ गुंठे क्षेत्र सोडून उर्वरित क्षेत्र बाळासाहेब व आप्पासाहेब यांच्याकडे आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या वाटपाच्या

दाव्यात मिळकत विक्री करु नये म्हणुन मी प्रतिवादींचे विरुध्द मनाई घेतली होती.

१६. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २९.१२.२०१८ रोजी माझे नांवे मोजणी खात्याने निकालाप्रमाणे मला कब्जा देऊन सातबा-यामध्ये माझे हिश्शाची नोंद करुन दिली. हे म्हणणे खरे आहे की, मी माझे वकिलांमार्फत प्रतिवादीला दिलेल्या नोटीसीला प्रतिवादीने तिचे वकिलांमार्फत उत्तर दिले होते. हे मला माहित नाही की, विमल ने माझे विरुध्द बक्षीसपत्र रद्द होऊन मिळणेकरिता दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे विमल हिचेशी संबंध चांगले नाहीत.

१७. मी गट नं.७५० मधील जमीनीची विक्री केलेली नाही. आमचे कुटुंबाचा शेती हा मुख्य व्यवसाय आहे. माझे युनियन बँक ऑफ इंडियाा शाखा- जयसिंगपुर येथे खाते आहे. शेती व्यतिरिक्त माझा गोठा व पानमळा आहे.

प्रश्न - तुम्ही बँकेत पैसे ठेवता का?

उत्तर - माझ्या हातात कारभार नाही.

१८. मी प्रतिवादीला दिलेल्या रक्कमेचा तपशिल मला सांगता येणार नाही. सदरच्या रक्कमा मी आमचे कुटुंबा व्यतिरिक्त इतर कोणत्या साक्षीदारा समक्ष दिल्या त्यांची नांवे मला सांगता येणार नाही. मी प्रतिवादीला बँकेतुन विशिष्ठ रक्कम काढुन दिली असे काही घडले नाही. प्रतिवादीला रक्कम देताना त्याचे फोटो काढुन ठेवलेले नाहीत. माझी बहिण अशिक्षित आहे. हे म्हणणे खरे आहे की, ती अंगठा उठवते. हे मला माहित नाही की, ती कोणत्या व्यवहारात पडते किंवा नाही. मी प्रतिवादीला दिलेल्या पैशाबाबत टिप्पण ठेवलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, कराराप्रमाणे प्रतिवादीला पैसे दिले असे दाखविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीला कराराप्रमाणे कसलीही रक्कम कधीही दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

१९. करारपत्र जयसिंगपुर येथे झाले आहे. करार करतेवळी मी, माझा मुलगा, विमल व तिचा मुलगा अमोल व नोटरी वकिल व इतर लोक हजर होतो. कराराच्या दिवशी प्रतिवादीला काही रक्कम दिली याचा उल्लेख करारापत्रात नाही. कराराच्या वेळी माझे वकिल हजर होते किंवा नाही हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, करारपत्रातील मजकुर काळे वकिलांनी लिहिला आहे. हे मला आठवत नाही की, त्या करारपत्रामध्ये काय मजकुर लिहिला आहे. हे मला आठवत नाही की, कोर्ट खर्चाकरिता मी प्रतिवादीला दहा लाख रुपये दिले असा उल्लेख करारापत्रात आहे. हे म्हणणे खरे आहे की, ३५ गुंठयापैकी १५ गुंठयासाठी या आधी स्विकारलेली दहा लाख रुपये किंमत ठरली होती. त्याबाबत वेगळी पावती केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.७५० पैकी १५ गुंठयाचे करारपत्र करणेचे ठरले होते. हे म्हणणे खरे आहे की, कराराचे वेळी प्रतिवादीचा हिस्सा तिला प्रत्यक्ष वाटुन मिळाला नव्हता याची मला माहिती होती. मी करारपत्र १५ गुंठयाचे केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीस भुलथापा देऊन मी तिच्याकडून खोटे करारपत्र लिहुन घेतले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीला रक्कम रुपये दहा लाख दिल्याचे भासवुन करारपत्र लिहुन घेतले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने मला कधीही खरेदीपुर्व करारपत्र लिहुन दिलेले नाही अगर मी तिला पैसे दिलेले नाहीत.

२०. करारपत्रातील मजकुर कोणी टाईप केला त्याचे नांव मला सांगता येणार नाही. किरण कृष्णा सेवेकरी हा माझा मुलगा आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीची मिळकत हडप करणेच्या उद्देशाने मी खोटे करारपत्र लिहुन घेतले आहे. हे म्हणणे खरे नाही की, विमल हिला तिचा हिस्सा मिळाला नसलेमुळे तिने करार करुन देणेचा प्रश्नच उद्भवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, विमलने तिच्या हिश्शाची मिळकत तुटक करुन घेतलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, विमल ही तिच्या हिश्शाची मालक झालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, तिला मिळकत विक्री करणेची कोणतीही आवश्यकता नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझ्या मुलाने प्रतिवादीची फसवणुक केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने मला करारपत्र

लिहुन दिलेले नसताना मी खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

वा.दा.का.दा. श्रवणोत्तर स्वीकृत्त,

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by
GANI MANIK NADAF
Date: 2026.07.28
17:39:52 +0530

दिनांक – २८.०७.२०२६ (जी. एम. नदाफ)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
इचलकरंजी.